

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित,

अमृत सेवाभावी संस्था परभणी

# कै.कु.दुर्गा.क बनमेरु विज्ञान महाविद्यालय लोणार,

*ता.लोणार जी.बुलडाणा पिन- ४४३३०२*

**E-mail.lkdkbscl@rediffmail.com**

**Phone (07260)221315**

## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत

# स्वच्छता विविध उपक्रम २०१९-२०

**प्राचार्यांचे नाव- डॉ. प्रकाश क. बनमेरु**

**रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी-प्रा. शिवशंकर पु.मोरे**

अमृत सेवाभावी संस्था परभणी

# कै.कु.दुर्गा क. बनमेरु विज्ञान महाविद्यालय ,

लोणी रोड,लोणार जि. बुलढाणा. पिन. ४४३३०२

## राष्ट्रीय सेवा योजना

## अनुक्रमानिका


| अ.क्र. | निकष | पान नं. |
|---|---|---|
| ०१ | स्वच्छता अभियान  महाविद्यालय परिसरव दत्तक ग्राम परिसर | ४–१६ |
| ०२ | कलापथक,पथनाट्य,प्रचारफेरी मार्फत जनजागृती | १७–२३ |
| ०३ | संदेशफलक,व्यााख्यान,चर्चाससत्र,गटचचर्चा,इ. | २४ |
| ०४ | ऐतिहासिक स्थळे स्वच्छता | २५–३४ |
| ०५ | जलकचरा,घनकचरा स्वच्छतेसंदर्भात केलेली कार्यवाही व जनजागृती | ३५–३८ |
| ०६ | मनाचे व शरीराचे स्वच्छता संदर्भात राबविलेल्या विवीध कार्यक्रमांची माहिती | ३८–४० |
| ०७ | दलित व गलीच्छ वस्ती स्वच्छता अभियान | ४१–४२ |
| ०८ | वृत्तपत्रकात्रन | ४३ |

# स्वच्छ भारत स्वस्त भारत

२ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने ' स्वच्छ भारत ' अभियान जाहीर केले.या अभियानाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात आहे.या मोहिमे अंतर्गत भारतातील सर्व शहरे,गावे स्वच्छ भारत या अभियाना अंतर्गत 'ओपन डेफोकेशन फ्री' म्हणजे हागणदारीमुक्त गाव करणे होय.यासाठी शौचालय बांधणीसाठी प्रयत्न करणे, शौचालय बांधणीसाठी अनुदान मिळते,या बाबत माहिती सोबतच ग्राम स्तरावर जनजागृती करणे.तसेच गावोगावी स्वच्छता राखण्यात यावी यासाठी शासन स्तरावर काही पुरस्कार दिले जातात.तसेच आपल्या जीवनामध्ये स्वच्छतेचे महत्व कोणी नाकरू शकत नाही. सर्वांना आपला चांगला परिसर शुद्ध हवा चांगले आरोग्य हवे असेल तर आपण आपल्या वैयक्तिक स्वच्छते पासून सुरवात करणे हे आपल्या व समाजासाठी हितकारक ठरेल हे प्रतेक नागरिकाचे कर्तव्य आहे.

'स्वच्छ भारत' ही एक शासनाची व्यापक चळवळ असून यांमध्ये आपण सर्वांनी सहभागी होऊन स्वच्छ भारत सुंदर भारत' ही संकल्पना पूर्णत्त्वास न्यायची आहे ही पूर्ण भारतीयांची जबाबदारी आहे. या मोहिमे अंतर्गत प्रत्येक गावात जाऊन स्वच्छते बद्दल जनजागृती, सांडपाणी नियोजन,शौचालय बांधणी,ओला कचरा सुका कचरा यांची विभागणी,तसेच वैयक्तिक स्वच्छता आदी बाबीचा समावेश होतो.

महाविद्यालयीन स्तरावर राष्टीय सेवा योजना हे कार्य खूप उत्साहाने करत आहे.तसेच रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका ग्रामीण स्तरावर जनजागृती करत आहे.म्हणजे माझ्यासाठी नव्हे तर तुमच्या साठी या रासेयो च्या घोष वाक्याप्रमाणे समाजामध्ये ही देशव्यापी चळवळ राबवीत आहे. आणी यामधून एक स्वस्त भारत निर्माण होईल.यासाठी आपण सर्वांनी दैनंदिन जीवनात स्वच्छते साठी थोडा वेळ देऊन स्वस्त भारत होण्यास हातभार लाऊया.

धन्यवाद !

# १) स्वच्छता अभियान महाविध्यालाय परिसर दत्तक ग्राम परिसर

## स्वच्छतेची शपथ आणि स्वच्छता अभियान

दि.१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१९ या कालावधीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या मार्फत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात येतो.तसेच या दिवशी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुण्यतिथी व लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर महाविध्यालयात १ ऑगस्ट २०१९ रोजी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली.तसेच रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना स्वच्छता पंधरवडा याबाबत माहिती देण्यात आली. तसेच आपणही दैनंदिन जीवनात स्वच्छते साठी काही वेळ दिला पाहिजेत आपला सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. यावेळी अमृत सेवाभावी संस्थेचे सचिव मा.डॉ.संतोष बनमेरू उपस्तीत होते.त्यानी आपल्या मार्गदर्शनात विध्यार्थ्यानी आपल्या स्वत: पासून सुरवात केली पाहिजेत आपण जिथे राहतो तो परिसर नियमित स्वच्छ ठेवला पाहिजेत.असे ते म्हणाले.




अमृत सेवाभावी संस्थेचे सचिव मा.डॉ.संतोष बनमेरू पुष्पहार अर्पण करतांना सोबत रासेयो कार्याक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे.




स्वच्छतेची शपत घेतांना रासेयो स्वयंसेवक, सेविका , डॉ. संतोष बनमेरू सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी




स्वच्छतेची शपत घेतांना रासेयो स्वयंसेवक, सेविका , डॉ. संतोष बनमेरू सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी




## स्वच्छता अभियान

दि.२ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक यांनी महाविध्यालय परिसर स्वच्छ केला.स्वच्छतेची शपथ घेऊन स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यास सुरवात करण्यात आली.महाविध्यालय परिसरातील केरकचरा, कागद, गाजर गवत स्वच्छ करण्यात आले.



महाविध्यालय परिसर स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक व सेविका सोबत रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा.मोरे सर



महाविध्यालय परिसर स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक व सेविका

## स्वच्छता अभियान दत्तक ग्राम पिंपळनेर

दि.८ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने दत्तक ग्राम पिंपळनेर येथे वृक्ष व जल संवर्धन रली चे आयोजन करण्यात आले होते.रली संपल्यावर रासेयो स्वयंसेवक यांनी जी.प.शाळा परिसर तसेच शाळेसमोरील परिसर स्वच्छ केला.यामध्ये स्वयंसेवक यांनी परिसरातील सर्व केरकचरा,पुठ्ठे,प्लास्टिकच्या पिशव्या,आदि कचरा जमा करण्यात आला व परिसर स्वच्छ करण्यात आला.यावेळी प्रा.कमलाकर वाव्हळ,रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा.शिवशंकर मोरे,शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.नागोराव यमालवाड यांनी सुद्धा या अभियानात सहभाग घेतला.



स्वच्छता अभियान मध्ये स्वच्छता करतांना रासेयो स्वयंसेवक कार्याक्रमाधीकारी प्रा.मोरे सर,प्रा.कमलाकर वाव्हळ सर शिक्षकेतर कर्मचारी श्री. नागोराव यमालवाड.




स्वच्छता अभियान मध्येसहभागी  रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका,   कार्याक्रमाधीकारी प्रा. मोरे सर, प्रा. कमलाकर वाव्हळ सर शिक्षकेतर कर्मचारी श्री.   नागोराव यमालवाड




जी प. शाळा पिंपळनेर येथे स्वच्छता केल्यांनतर जमा केलेला कचरा

## स्वच्छता अभियान (श्रमदान)

९ ऑगस्ट २०१९ ला रोजी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक यांनी महाविध्यालय परिसर स्वच्छ केला. महाविद्यालयात दर शुक्रवारी महाविध्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात येते या निम्मीत्त आज महिविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला .महाविध्यालय परिसरातील केरकचरा, कागद, गाजर गवत स्वच्छ करण्यात आले. यावेळी रासेयो स्वयंसेवक उपस्तीत होते.



महाविध्यालय परिसर स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक



महाविध्यालय परिसर स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक



महाविध्यालय परिसर स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना दिना निम्मीत्त स्वच्छता अभियान

दि.२६ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिना निम्मीत्त महाविध्यालयाच्या प्रस्तावित इमारतीत रासेयो स्वयंसेवक व सेविका यांनी तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.या ठिकाणी असलेला केर कचरा स्वयंसेविका यांनी उचलला तर स्वयंसेवक यांनी गाजर गवत,प्लास्टिक झाडाच्या फांद्या,जमा केल्या.रासेयो स्वयंसेवका यांनी महाविध्यालयाच्या आतील परिसर यामध्ये असलेले गाजर गवत इतर केरकचरा जमा केला तर स्वयंसेवक यांनी बाहेरील परिसरातील असेलेले गाजर गवत,तरोटा,व इतर झाडे मुळासहित काढून एका ठिकाणी जमा करण्यात आला.यामध्ये महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी सहभाग घेउन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.




गाजर गवत निर्मुलन करतांना स्वयंसेविक सोबत प्रा. डॉ सूर्यकांत बोरूळ सर




प्लास्टिक व गाजर गवत निर्मुलन करतांना स्वयंसेविक सोबत कर्मचारी




प्लास्टिक व गाजर गवत निर्मुलन करतांना स्वयंसेविका सोबत प्रा. डॉ महेंद्र भिसे, प्रा. वाव्हळ सर




तरोटा व गाजर गवत काढतांना रासेयो स्वयंसेवक




महाविध्यालयाच्या रासेयो पथकाने गाजर गवत निर्मुलना सोबत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सोबत रासेयो स्वयंसेवक स्वयंसेविका

## स्वच्छता अभियान

दि.२ अक्टोबर २०१९ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती लाल बहुदार शात्री पुंण्यातिथी साजरी करण्यात आली.यावेळी महाविध्यालायात महात्मा गांधी व लाल बहादूर शात्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. खऱ्या अर्थाने स्वच्छतेचे जनक महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून स्वच्छता अभियान उदयास आले त्या निमीत्ताने महावीध्यालायात महात्मा गांधी जयंती साजरी करून आज समाजामध्ये स्वच्छतेची गरज आहे.यानिमित्त महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले यावेळी रासेयो स्वयंसेवक महाविध्यालयातील कर्मचारी यांनी स्वच्छता तसेच गाजर गवत व प्लास्टिक,परीसारतील केर कचरा स्वच्छ करण्यात आला.




गाजर गवत निर्मुलन करतांना रासेयो स्वयंसेवक महाविद्यालयातील कर्मचारी




गाजर गवत निर्मुलन करतांना रासेयो स्वयंसेवक महाविद्यालयातील कर्मचारी




जमा केलेला कचरा व गाजर गवत त्यासोबत रासेयो स्वयंसेवक महाविद्यालयातील कर्मचारी

**स्वच्छंता अभियान** :- १० डिसेंबर २०१९ स्वयंसेवकानी जी.प. शाळा परिसर स्वच्छं केला.तसेच गावातील मुख्य रस्ते,स्मारके,यांची स्वच्छंता करण्यात आली.जी.प. शाळेचा मोठा परिसर असून या मध्ये खूप झाडे लावली आहेत. त्या झाडाना आळे करण्यात आले.६५ ते ७० आळे तसेच या झाडांना शाळेमध्ये असलेल्या बोअरवेल्स वरून पाणी घालण्यात आले. स्वयंसेवकानी शाळेच्या पाठीमागील मैदानात खूप गाजर गवत होते ते विळयाने कापून मैदान स्वच्छं करण्यात आले.शाळेच्या भोवती मोठ्या प्रमाणात प्लास्टिक,कागद ,पुठ्ठे, अस्ताव्यस्त विखुरलेले होते ते वेचून जमा करून गावाबाहेर टाकण्यात आले.शाळेत जाण्यासाठी मुख्य रत्यावर काही उकिरडे पसरले होते ते सुद्धा स्वयंसेवक यांनी स्वच्छं केलेत.या मुले शाळेतील मुलांना ये-जा करण्यासाठी त्रास होणार नाही.स्वयंसेवक यांनी २ तास श्रमदान करून स्वच्छंता केली.तसेच शाळेच्या आवारात असलेले गाजर गवत इतर सुखा कचरा जमा करण्यात आला.



स्वच्छता करतांना स्वयंसेवक



स्वच्छता करतांना स्वयंसेवक




जि.प.शाळा मागील परिसरातील गाजर गावात काढतांना रासेयो स्वयंसेवक

## २) कलापथक, पथनाट्य, प्रचारफेरी मार्फत

### स्वच्छता अभियान पथनाट्य

दि.११ डिसेंबर २०२० रोजी दत्तक ग्राम पिंपळनेर येथे रासेयो स्वयंसेवक यांनी स्वच्छता या विषयावर पथनाट्य सादर केले.स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा बाबा यांनी आपणास हा संदेश दिला कि आपले आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर प्रथम आपले घर व घरासाभोवातालचा परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे.यासाठी आपण आपल्या घराची तसेच आपल्या गावाची स्वच्छता ठेवा.यावर आधारित रासेयो स्वयंसेवक यांनी गावात स्वच्छ आपले गाव यावर आधारित पथनाट्य सादर केले.

यातून एक संदेश देण्यात आला कि स्वच्छते मुले आपले आरोग्य चांगले राहते.तसेच बरेच रोग हे स्वच्छते अभावी होतात त्यामुळे आपले आरोग्य धोक्यात येउ शकते.आपण उघड्यावर संडास ला जाऊ नये घरीच स्वच्छतागृह बांधून घ्यावे.यासाठी शासन यांच्या योजना यांची माहिती दिली. या पथनाट्यमध्ये रासेयो स्वयंसेवक वैभव मोरे, शेख मुस्थाकीन, संतोष वाबळे, मोहन सोलंकी यांनी सहभाग घेतला.



दत्तक ग्राम पिंपळनेर येथे पथनाट्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक



दत्तक ग्राम पिंपळनेर येथे पथनाट्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक व उपस्तीत नागरिक

# रांगोळी स्पर्धा

११ ऑगस्ट २०२० रोजी स्वच्छता पंधरवडा अंतर्गत महाविद्यालयात स्वच्छता जनजागृती करण्यासाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये स्वच्छता या विषायावर सहभागी स्पर्धकांना २ बाय २ या नेमून दिलेल्या जागेमध्ये रांगोळी काढायची होती.रांगोळी स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून महिला व बाल कल्याण समितीच्या प्रमुख मा.सौ.अश्विनी सोने होत्या.या स्पर्धे मध्ये अतिशय सुबक अश्या रांगोळी काढण्यात आल्या होत्या.



परीक्षक मा.सौ.सोने मडम यांचे स्वागत करतांना मा.प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर






स्वयंसेवका यांनी काढलेल्या सुबक रांगोळी सुबक कृती



रांगोळी चे परीक्षण करतांना परीक्षक व मा. प्राचार्य डॉ.बनमेरू सर



स्वयंसेवका यांनी काढलेल्या सुबक रांगोळी सुबक कृती

## प्रचारफेरी

स्वच्छता फेरी चे आयोजन दत्तक ग्राम पिंपळनेर येथे दि.१० ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले होते.या प्रचार फेरी ची सुरवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस मा.सरपंच संजय सानप,जी.प मुख्यध्यापक मा.सरदार सर, ग्रामपंचायत सदस्य मा. प्रवीण दराडे यांनी प्रतिमा पूजन बारदानी महाल,केले.त्यानंतर जी.प. शाळेतून स्वच्छता फेरी ला हिरवी झेंडी मा.सरपंच संजय सानप यांनीदाखवून सुरवात करणात आली.गावा मध्ये मुख्य रस्ते, प्राचीन गढी, स्मारके,हनुमान मंदीर,ग्रामपंच्यायत कार्याळयाची स्वच्छंता करण्यात आली.प्लास्टीक,केर कचरा,उचलण्यात आला.व तो गावाच्या बाहेर टाकण्यात आला रा.से.यो. स्वयंसेवकानीं स्वच्छंता अभियान राबवीत असतांना नागरिकांना जर घरा समोर काही कचरा असेल तर त्या बद्दल माहिती सांगून या कचऱ्या मुले आपले आरोग्य धोक्यात येईल त्या मुले आपणच रोगांना आमंत्रण देऊ या बाबत जनजागृती करणात आली तसेच स्वच्छ पिंपळनेर सुंदर पिंपळनेर अश्या घोषणा देण्यात आल्या. जवळ पास ही स्वच्छंता फेरी दीड तास गावातून काढण्यात आली.व तसेच यामध्ये गावातील काही महाविद्यालयातील माजी विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



स्वच्छता रली ला सुरवात करण्यापूर्वी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतांना पिंपळनेर गावाचे सरपंच मा.संजयभाऊ सानप, जी.प.मुख्याध्यापक मा.सरदार सर मा.पोलीस पाटील तसेच रासेयो कार्याक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे




स्वच्छता फेरी ला हिरवी झेंडा दाखवतांना मा.सरपंच संजय सानप




जि.प.शाळेतून स्वच्छता फेरीला सुरवात करण्यात आली




स्वच्छता करतांना स्वयंसेवक




ग्रामपंचायत कार्यालयाजवळ स्वच्छता करतांना स्वयंसेवक

## ३) संदेश फलक, व्याख्यान, चर्चासत्र गटचर्चा ई.

### संदेश फलक

दि. ११/१२/२०२० दत्तक ग्राम पिंपळनेर येथे रासेयो निवासी शिबिर दरम्यान स्वच्छता जनजागृतीसाठी जी.प.शाळेच्या भिंतीवर स्वच्छतेचे संदेश रासेयो स्वयंसेवक वैभव मोरे व सुरेश मुसळे यांनी लिहले यामध्ये स्वच्छ भारत सुंदर भारत, सांडपाण्याची योग्य विल्लेवाट घेऊन येईल आरोग्याची पहाट, स्वच्छता आली अंगणात समाज का अंधारात, आदि नारे भिंतीवर पेंटिंग करण्यात आले. यामधून सांडपाणी नियोजन तसेच स्वच्छतेचे महत्व नागरिकांना नक्कीच समजेल.




जि.प.शाळा पिंपळनेर येथील भिंतीवर स्वच्छता नारे लिहितांना वैभव मोरे

## ४) ऐतिहासिक स्थळाची स्वच्छता,सरकारी कार्यालये,ई स्वच्छता

### विरज धार तीर्थ येथे स्वच्छता अभियान

दि.१०ऑगस्ट २०१९ रोजी महाविध्यायातील राष्ट्रीय सेवा योजना व पुरातनतत्व विभाग यांच्या संयुक्त विध्यमाने लोणार सरोवर येथील विरज धार तीर्थ येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

लोणार येथे गोमुख धार प्रसिध्द असून येथे गायीच्या मुखातून कायम पाण्याचा प्रवाह चालू असतो.त्यामुळे येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते.त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात कचरा जमा होतो.आणि भाविक मोठ्या प्रमानात पूजेचे सामान,काही हार,बेल वाहून मुख्य प्रवाहात सोडतात त्यामुळे त्या प्रवाहास अडथला निर्माण होतो व परिसरात दुर्गंधी पसरते त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटक यांना त्रास होतो.तसेच जल प्रदूषण होते त्यामुळे दरवर्षी महाविध्यालायाचे रासेयो युनिट व पुरातन तत्व विभाग स्वच्छता पंधरवडा या निनित्त स्वच्छता अभियान राबविण्यात येते.त्यानिम्मीत्त या परिसराची स्वच्छता करण्यात आली.यावेळी धारेचा मुख्य प्रवाहापासून सुरवात आली यामध्ये प्रवाहातील असलेले वाढलेले गवत,बेल.वाळलेली पाने फुले. झाडाच्या फांद्या,प्रथम वेगळे करण्यात आले.तसेच प्रवाहाचा मार्ग स्वच्छ केला.तो बकेट मध्ये भरून कचरा गाडीत टाकण्यात आला.जवळपास ४०० ते ५०० मीटर प्रवाहातील कचरा स्वच्छ करण्यात आला.तसेच खाली असलेले महादेव मंदिर येथे श्रावण मास असल्यामुळे बेल आदि पूजेचे सामान सोडतात त्या मुळे या मंदिर परीसरातील बेल जमा करण्यात आला.या स्वच्छता अभियानात मोठ्या प्रमाणात रासेयो स्वयंसेविका व स्वयंसेवक यांच्या सोबत कार्याक्रमाधीकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी सुद्धा या अभिनयात सहभाग घेतला.यासाठी पुरातनतत्व विभागाचे प्रमुख मा.हुकरे यांचे मार्गदर्शन लाभले.



विरज धार तीर्थ येथे स्वच्छता करतांना स्वयंसेवक धारेच्या मुख्य प्रवाहातील कचरा काढतांना



विरज धार तीर्थ येथे स्वच्छता करतांना स्वयंसेवक




विरज धार तीर्थ येथे स्वच्छता करतांना स्वयंसेवक धारेच्या मुख्य प्रवाहातील कचरा काढतांना



स्वच्छता करतांना  तसेच जमा केलेला कचरा बकेट मध्ये टाकतांना रासेयो स्वयंसेविका



धार परीसरातील बेल केरकचरा स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका सोबत कार्याक्रमाधीकारी प्रा. शिवशंकर मोरे.

## सरकारी कार्यालये स्वच्छता अभियान (पंचायत समिती, महिला व बाल कल्याण कार्यालय, आरोग्य विभाग कार्यालय लोणार)

दि. ९ सप्टेंबर २०१९ रोजी महाविध्यालयाच्या रासेयो पथकाने सकाळी ८.०० वा. पंचायत समिती कार्यालय, महिला व बाल कल्याण विभाग कार्यालय, तसेच तालुका आरोग्य कार्यालय, लोणार तालुखा बचत गट कार्यालय या आदि परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच या परिसरात राहणाऱ्या स्थानिक कर्मचारीवर्ग यांच्या कार्टर यांची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये रासेयो स्वयंसेवक यांनी प्रथम या परीसरातील गाजर गवत होते. व त्या मध्ये मोठ्या प्रमाणात कचरा पाणी बॉटल होत्या त्या काढण्यात आल्या . त्या नंतर प्लास्टिक, झाडाची पाने झाडून तसेच प्लास्टिक पाणी बॉटल मोठ्या प्रमाणात जमा करण्यात आल्या. रासेयो स्वयंसेविका यांनी खराटे घेऊन संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्या सोबत या परिसरात असलेले झाडे यांना आळे करण्यात आले. पंचायत समिती असल्यामुळे येथे लोकांची मोठी गर्दी असते. व तसेच नागरिक बिनकामाचे कागद असेच इतरत्र फेकून देतात त्या मुळे कचरा होतो. रासेयो स्वयंसेवक यांनी सर्व कचरा जमा करून एका ठिकाणी जमा करण्यात आला. जवळपास दोन तास हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यासाठी तालुखा आरोग्य अधाकारी कार्यालयातील मा. अशोक शिंदे सर, मा. हिंगे सर, मा. ठाकरे सर यांचे सुद्धा सहकार्य लाभले. त्या सोबतच रासेयो कार्याक्रमाधीकारी शिवशंकर मोरे यांनी या अभियानासाठी परिश्रम घेतले




पंचायत समिती कार्यालय स्वच्छता करतांना रासेयो स्वयंसेवक




महिला व बाल कल्याण कार्यालय येथे वृक्षाना आळे करतांना रासेयो स्वयंसेवक व कचरा झाडून काढतांना स्वयंसेविका




स्वयंसेवकांनी जमा केलेला कचरा प्लास्टिक पुठ्ठे, गाजर गवत ई.




आरोग्य सेवक कर्मचारी यांच्या निवासासमोर स्वच्छता करतांना कार्याक्रमाधीकारी प्रा. शिवशंकर मोरे रासेयो स्वयंसेवक



जमा केलेला कचरा कचरा कुंडी कडे नेत असतांना रासेयो स्वयंसेवक शिक्षकेत्तर कर्मचारी




रासेयो स्वयंसेवक यांनी जमा केलेला कचरा सोबत स्थानिक काही नागरिक यांनी सुद्धा सहकार्य केले .




स्वच्छता केल्यानंतर पंचायत समिती परिसर

## ऐतिहासिक स्थळ प्राचीन गढी पिंपळनेर

दि. १५ डिसेंबर २०१९ रोजी दत्तक ग्राम पिंपळनेर येथे रासेयो शिबिरा दरम्यान स्वयंसेवकांनी या गावामध्ये असलेले ऐतिहासिक जुनी गढी असून या गढी जवळचा परिसर स्वच्छ केला या परिसरामध्ये स्थानिक नागरिक कचरा टाकत असत परंतु आश्या ऐतिहासिक वस्तू आपुन जपल्या पाहिजेत अश्या ठिकाणी केरकचरा न टाकता त्या पौराणिक वस्तू जपल्या पाहिजेत अशी माहिती देण्यात आली.त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक,वाळलेले गवत,कागद,आदि कचरा जमा केला.व तो परिसर स्वच्छ करण्यात आला.जवळपास एक ट्राली कचरा जमा करण्यात आला व नागरिकांच्या मदतीने तो गावाबाहेर टाकण्यात आला.



प्राचीन गढी जवळ असलेला केरकचरा



स्वच्छता करतांना स्वयंसेवक




स्वच्छता करतांना स्वयंसेवक




स्वच्छता केल्यानंतर दिसणारा परिसर

## ५) जलकचरा , घनकचरा स्वच्छते संदर्भात केलेली जनजागृती


### "घनकचरा व्यवस्थापन व जालशक्ती अभियान

दि.६ जुन २०२० रोज रविवारला राष्टीय महात्मा गांधी परिषद व ग्रामीण शिक्षण हैद्राबाद याच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नुसार ५ जून या "जागतिक पर्यावरण दिन" या निमित्त महाविध्यालयात राष्टीय सेवा


योजनेद्वारे या एक दिवशीय "घनकचरा व्यवस्थापन व जालशक्ती अभियान" या विषयावर ई-कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथील राष्टीय सेवा योजनेचे संचालक मा. डॉ. राजेश बुरंगे सर हे होते. या कार्यशाळेचे ई-उद्घाटन मा. संतोष क. बनमेरू (सचिव अमृत सेवाभावी संस्था परभणी) तर कार्यक्रमाचे उद्घाटनपर मार्गदर्शन महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बन मेरू यांनी केले. त्यानी या सर्व कार्यशाळे चे पार्श्वभूमी सांगतली. तसेच त्यांनी राष्टीय महात्मा गांधी परिषद व ग्रामीण शिक्षण हैद्राबाद या संस्थेचे रचना व कार्य स्पष्ट करून प्रदूषण रोखण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन तसेच पाणी साठवण्यासाठी कोणकोणत्या योजना आहे याबाबद माहिती दिली. तर प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. राजेश बुरुंगे सर यांचा थोडक्यात परिचय रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. शिवशंकर यांनी करून दिला.


त्यानंतर मा. बुरंगे सर यांनी घनकचरा व्यवस्थापन हि एक काळाची मोठी समस्या झाली आहे परंतु आपण राष्टीय सेवा योजना अश्या विविध उपक्रमातून यावर मात करू शकतो यामध्ये ओला कचरा सुखा कचरा वेगळा करणे या बाबाद जनजागृती करणे काचर्याचे वर्गीकरण करणे, काही कचरा पुनर्रवापर करता येतो याबद विचार करणे आदी महत्वाच्या मुद्द्यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जलशक्ती अभियान म्हणजे काय याचे थोडक्यात आपल्याच विद्यापीठामध्ये रासेयो च्या वतीने एक तलाव श्रमदानातून निर्माण करण्यात आला. आज तो संपूर्ण तलावामुळे या परीसारीतील वृक्षांना पाणी मिळून परिसर हिरवा झाला आहे. याचा प्रमाणे आपणही आपल्या महविद्यालयात, दत्तकग्राम मध्ये अश्या पाणी अडवून जमिनीमध्ये जिरवावे यामुळे पाणीपातळी वाढेल असे ते म्हणाले. या कार्यशाळेमध्ये ८४ जणांनी आपला सहभाग नोंदवला तसेच कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. शिवशंकर मोरे यांनी ऑनलाईन उपस्तीत सर्वाचे आभार मानून आपण कोरोना या गंभीर आजारापासून वाचण्यापासून घरीच राहा सुरक्षित राहा याबाबद माहिती दिली. तसेच या कार्यशाळेसाठी रासेयो व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य डॉ. ठोंबळ सर, महिला कार्यक्रमाधाकारी मा. सौ. मापारी मडम तसेच तंत्रज्ञ सहाय्यक म्हणून प्रा. देव्हडे यांचे सहकार्य लाभले. तसेच या कार्यशाळेचे ई-प्रमाणपत्र सुद्धा देण्यात आले.


(ZOOM app)
Join zoom Meeting Link https://us04web.zoom.us/j/9916593755?pwd=R1VWazFkaWtzZkJDQm9Sb2JPSVJ1QT09
Zoom
ID :- 9916593755
LKDKB337
feedback link
feedback


Zoom Meeting 40-Minutes
Recording...
00:08:31
Speaker View
Prakashr Banmeru
Rameshwar Devhade
Megha Apturkar
realme 5 pro
Balasaheb Kale
National Service Sche...
Pramod devke
Ratanlal Laxma...
Ashvini Sarkate
Saurabh Gaikwad
Dr K F Shelke LPP Coll...
Vaibhav Hade
Gaurav Kathalkar
Dr Shrikrushna...
Dr.Rajesh Burange
Galaxy J2
chitra morey
Madhuri Kopulwar
sanket torkadi
RAJESH MATHURKAR
vijaykharate8@gmail...
Prof. Bhimrao Jambha...
Yogesh kale
e84f08e3
Shivani Dhawne
Unmute
Start Video
Security
Participants
Chat
Share Screen
Pause/Stop Recording
Reactions
End
Type here to search
ENG
5:38 AM
06/06/2020


3:33
Zoom
Leave
Recording
realme 5 pro
Dr.Rajesh Burange
Shivani Dhawne
RAJESH MATHURKAR
Unmute
Stop Video
Share
Participants
More




सदर कार्यशाळेसाठी सहभागी प्राध्यापक व विध्यार्थी

## ६) मनाचे व शरीराची स्वच्छता संदर्भात राबविलेल्या विविध कार्यक्रम यांची माहिती

## निरोगी शरीराचा मूलमंत्र व्याख्यान

दि. ९ डिसेंबर २०१९ रोजी रासेयो निवासी शिबिरामध्ये बौद्धिक सत्रा मध्ये निरोगी शरीराचा मूलमंत्र व्याख्यानया विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. वसंत गिरी सर यांना आमंत्रित करण्यात आले होते. आपल्या प्रमुख मार्गदर्शनात आपण दैनंदिन जीवन जगत असतांना आपल्या शरीराकडे लक्ष दिले पाहिजेत यामुळे आपले शरीर निरोगी राहते. सकाळी लवकर उठून अंघोळ केल्याने मन प्रसन्न राहते. तसेच योग व्यायाम केल्याने मानसिक स्वास्थ टिकून राहते. कोणतेही काम केल्यानंतर हात पाय स्वच्छ केले पाहिजेत . त्याचबरोबर आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजेतअसे ते म्हणाले.




मा. श्री, गिरी सर यांचे स्वागत करतांना स्वयंसेवक वैभव मोरे




मार्गदर्शन करतांना प्रा. वसंत गिरी सर




मार्गदर्शन करतांना प्रा. वसंत गिरी सर

# ७) दलित वस्ती जनजागृती अभियान

## प्लास्टिक मुक्ती अभियान

२७ सप्टेंबर २०१९ रोजी लोणार येथील नवीन झोपडपट्टी वस्तीवर रासेयो स्वयंसेवक यांनी प्लास्टिक मुक्ती अभियान राबविण्यात आले.स्वयंसेवक यांनी या परिसरात घरोघरी जाऊन तेथील नागरिकांना आपल्या सभोवताली आपण टाकत असलेला कचरा यामुळे आपणच आपल्या आरोग्यसाठी हानी पोचवतात यामुळे होणार्या आजाराची माहिती दिली.तसेच त्यांच्या मदतीने कचरा, पुठ्ठे यांचे साफसफाई करण्यात आली.



काचराबद्दल माहिती देतांना स्वयंसेवका व स्वयंसेवक



स्वयंसेवक यांनी जमा केलेला कचरा

# वृत्तपत्र कात्रण

व विद्यार्थ्यांना प्रयत्न केले.

## बनमेरु महाविद्यालयाच्या रासेयो युनिट कडून स्वच्छता पंधरवाडा साजरा



स्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी व शिक्षक

*तालुका प्रतिनिधी/२० ऑगस्ट*

**लोणार** : येथिल कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने तसेच प्राचार्य डॉ. प्रकाश क.बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता पंधरवाडा विविध ठिकाणी स्वच्छता करून साजरा करण्यात आला. यामध्ये १ आगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यासाठी अमृत सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतोष बनमेरू उपस्थीत होते. यावेळी स्वच्छतेची शपथ घेवून महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली.

त्यानंतर ८ ऑगस्ट रोजी लोणार सरोवरामध्ये असलेल्या विरज धारतिर्थ येथे स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली. यामध्ये धारेच्या मुख्य प्रवाहामध्ये श्रावण महिन्यात भाविक मोठ्या प्रमाणात बेल, तसेच पुजा सामग्री प्रवाहात सोडतात त्यामुळे पाणी प्रवाहास अडथळा निर्मान होतो. प्रवाहातील संपूर्ण केरकचरा, बेल, पुजा सामग्री डस्टबीन मध्ये भरून स्वच्छता करण्यात आली.

यावेळी पुरातत्व विभागातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. तसेच १० ऑगस्ट रोजी रा.से.यो.दत्तक ग्राम पिंपळणेर येथे वृक्षजल संवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले तसेच शाळेच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये प्लाटिक बॅग, पुठ्ठे, कागद इ.कचरा जमा करण्यात आला. त्यानंतर १४ ऑगस्ट रोजी महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. यासाठी रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांच्या सोबत प्रा.डॉ.मंगेश ठोंबळ शिक्षकेत्तर कर्मचारी नागोराव यमलवाड यांचे सहकार्य लाभले. अशा पध्दतीने स्वच्छता पंधरवाडा साजरा करतात आला.

| | |
|---|---|
| कार्यक्रमाधिकारी | प्राचार्य |
| प्रा. शिवशंकर पु. मोरे | डॉ. प्रकाश क. बनमेरू |